आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

३१ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उद्या सकाळी अर्थसंकल्प सादर करणार

- चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा आर्थिक पाहणी अहवालाचा अंदाज

- देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी योगदान देण्याचं, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं सर्वांना आवाहन

**आणि**

- सचिन तेंडुलकरला BCCI चा सी के नायडू जीवनगौरव पुरस्कार जाहीर, जसप्रीत बुमराह आणि स्मृती मंधाना सर्वोत्कृष्ट खेळाडू

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उद्या सकाळी ११ वाजता लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतील. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी राज्यसभेत अर्थसंकल्प मांडतील.

श्रोते हो, केंद्रीय अर्थसंकल्पाच्या निमित्ताने उद्या आकाशवाणीवर विशेष कार्यक्रम आपल्याला ऐकता येतील. यामुळे दुपारी दीड वाजता प्रसारित होणारे राष्ट्रीय बातमीपत्र दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी प्रसारित होईल. दुपारी ३ च्या आणि संध्याकाळी ७ च्या प्रादेशिक बातमीपत्रांचा कालावधी ५ मिनिटांनी वाढवला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला करसवलती मिळाव्या, किमान आधारभूत किंमत वाढवून मिळावी, अशी अपेक्षा प्रगतीशील शेतकरी विलास शिंदे यांनी आकाशवाणीसोबत बोलताना व्यक्त केली.

**होल्ड - विलास शिंदे**

**<><><><><>**

उद्या सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर आज सलग चौथ्या दिवशीही भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज ७४१ अंकांनी वधारला आणि ७७ हजार ५०१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २५९ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ५०८ अंकांवर बंद झाला. गेल्या चार दिवसांमध्ये सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये एकूण अनुक्रमे २ हजार १३४ आणि ६७९ अंकांची वाढ झाली.

**<><><><><>**

देशाचा वास्तविक जीडीपी वृद्धीदर चालू आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त केला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज २०२४-२५ या वर्षातल्या आर्थिक पाहणीचा अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे सादर केला. कारखाना क्षेत्राला मात्र देशाबाहेरुन मागणी घसरल्याचा फटका बसला आहे. वैयक्तिक उपभोगाचं प्रमाण स्थिर राहिलं, आर्थिक शिस्त आणि सेवा पुरवठ्यात वाढ या मजबूत बाबींमुळे स्थूल रुपानं आर्थिक स्थैर्य मिळालं असं अहवालात नमूद केलं आहे. २०११- १२मधे स्थिर केलेल्या निकषांवर आधारित चलनफुगवट्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ६ पूर्णांक ७ दशांश टक्के तर पूर्ण वर्षभरात ५

पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ झाली. चालू आर्थिक वर्षाच्या पूर्वार्धात जीडीपी वाढीचा दर ६ टक्के राहिला, असं अहवालात म्हटलं आहे.

देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात शेतीचं योगदान पाऊण ते एक टक्क्यानं वाढणार असून कृषी क्षेत्रच आर्थिक वाढीसाठी आश्वासक असल्याचं मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही अनंत नागेश्वरन यांनी म्हटलं आहे. सिंचनाच्या सुविधा, जमिनींचं एकत्रीकरण आणि शिक्षणक्षेत्रातल्या सुधारणा यामुळे कृषी क्षेत्रात एक टक्के वाढ होऊ शकते असं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सर्व नागरिकांनी योगदान द्यावं. त्यासाठी महात्मा गांधी आणि सरदार पटेल यांच्यासारख्या थोर नेत्यांनी दिलेली एकतेची शपथ आठवावी आणि देशाच्या रक्षणासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांकडून प्रेरणा घ्यावी, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करत होत्या.

**होल्ड - कॅप्सूल (१.१८ सेकंद)**

देशाच्या विकासासाठी सरकार अभूतपूर्व वेगानं काम करतं आहे. गेल्या १० वर्षात पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पातली तरतूद साडे ५ पटींनी वाढल्याचं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाइट - राष्ट्रपती**

मेक इन इंडिया कडून आता मेक फॉर वर्ल्ड याकडे देशानं वाटचाल सुरू केली आहे. यामुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. देशाच्या सीमा आणि अंतर्गत सुरक्षा यांचं रक्षण करण्यासाठी सरकारनं

ऐतिहातिक पावलं उचलली आहेत. एक देश एक निवडणूक, वक्फ सुधारणा विधेयकासारख्या मुद्द्यावरही सरकारनं प्रगती केल्याचं त्यांनी सांगितलं.

शिक्षण, महिला सशक्तीकरण, कर्मचाऱ्यांचे हित, क्रीडा क्षेत्र याकडे सरकारचे लक्ष आहे. सरकारनं डिजिटल तंत्रज्ञानाला समानता आणि सामाजिक न्यायाचं नवं माध्यम बनवलं आहे असं त्या म्हणाल्या. यातूनच छोट्या गावांपर्यंत बँकिंग आणि युपीआय सारख्या जागतिक दर्जाच्या सेवा उपलब्ध झाल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी सरकार निरंतर प्रयत्न करत आहे. सरकारी योजनांचा सर्वाधिक लाभ वंचित, गरीब आणि आदिवासी समुदायाला होत असल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग, ओमप्रकाश चौटाला आणि ३ माजी खासदारांना आदरांजली वाहिली. त्यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२४-२५ चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल सदनात सादर केला. त्यानंतर सदनाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही दिवंगत संसद सदस्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल राज्यसभेत सादर करण्यात आला आणि सदनाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

गुइलेन बॅरे आजाराचं निदान झालेल्या दोन रुग्णांचा आज पुण्यात मृत्यू झाला. त्यामुळे राज्यात या आजारानं मरण पावलेल्यांची संख्या आता ४  झाली

आहे.  आज मृत पावलेल्यांमध्ये एका टॅक्सी चालकाचा आणि एका वृद्ध महिलेचा समावेश आहे. राज्यात गुइलेन बॅरे आजाराच्या संशयित रुग्णांची संख्या १३० वर पोहोचली असून यापैकी २० रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर उपचार घेत आहेत, अशी माहिती आरोग्य विभागानं दिली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंड इथे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने आतापर्यंत ३२ पदकांची कमाई केली आहे. यात ७ सुवर्ण, १६ रौप्य आणि ९ कास्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र पदक तालिकेत मणिपूर, संरक्षण दल आणि कर्नाटकनंतर चौथ्या स्थानावर आहे. १० मीटर एअर पिस्तुल स्पर्धेत पार्थ माने याने सुवर्ण पदक तर रुद्रांश पाटीलनं रौप्य पदक पटकावलं. सेना दलाच्या अंकुश जाधव याने या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. खो-खोमध्ये महाराष्ट्राचा पुरुष संघ अंतिम फेरीत पोहोचला आहे. जलतरणात प्रतिक्षा डांगी, रिषभ दास, अवंतिका चव्हाण, मिहीर आंब्रे यांनाही पदक मिळाली.

**<><><><><>**

विक्रमवीर सचिन तेंडुलकरला BCCI चा सी के नायडू जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. तर पॉली उम्रीगर सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय खेळाडूचा पुरस्कार पुरुष गटात जसप्रीत बुमराने तर महिलांमधे स्मृती मानधनाने पटकावला आहे.

**<><><><><>**

१९ वर्षाखालच्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतानं अंतिम सामन्यातलं स्थान निश्चित केलं आहे. आज क्वालालंपूर इथं झालेल्या  उपांत्य फेरीतल्या सामन्यात भारतानं,  इंग्लंडवर ९ गडी राखून मात केली.

प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं २० षटकात ८ गडी गमावून ११३ धावा केल्या. भारतातर्फे परुनिका सिसोदिया, आणि वैष्णवी शर्मा यांनी प्रत्येकी ३, तर आयुषी शुक्लानं २ गडी बाद केले. विजयासाठी ११४ धावांचं लक्ष्य भारतानं १५ षटकातच एका गड्याच्या मोबदल्यात ११७ धावा करत पार केलं.

त्या आधी झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं ऑस्ट्रेलियावर मात करत पहिल्यांदाच या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. त्यामुळे अंतिम सामन्यात भारताची लढत दक्षिण आफ्रिकेशी होईल.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लडं यांच्यातल्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात भारताची सुरुवात खराब झाली. संघाच्या १२ धावा झालेल्या असतानाच सामन्यातल्या ७ व्या चेंडूवर सलामीवीर संजू सॅमसन फक्त एक धाव काढून बाद झाला. त्यानंतर तिलक वर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादव पाठोपाठ भोपळाही न फोडता तंबूत परतले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १५ व्या षटकात ५ बाद १११ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**